**ठळक बातम्या**

- जंतरमंतरवर विद्यार्थी आंदोलकांविरुद्ध बळाचा अवाजवी वापर केल्याप्रकरणी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आजही गदारोळ, राज्यसभेचं कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब

- नीट यूजी पेपरफुटी प्रकरणातल्या १३ आरोपींविरुद्ध सीबीआयकडून दिल्लीतल्या विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल

- राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या दहा हजार मीटर धावण्याच्या शर्यतीत गुलवीर सिंगने पटकावलं रौप्यपदक

**आणि**

- पाकव्याप्त काश्मीरमध्ये गेल्या दोन दिवसात झालेल्या हिंसाचारात ४० जणांचा मृत्यू

**<><><><><>**

जंतरमंतरवर विद्यार्थी आंदोलकांविरुद्ध बळाचा अवाजवी वापर केल्याप्रकरणी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आजही गदारोळ झाल्यानं लोकसभा आणि राज्यसभेचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करावं लागलं. त्यानंतर राज्यसभेचं कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. सकाळी ११ वाजता **लोकसभेच्या** कामकाजाला सुरुवात होताच सभापती ओम बिर्ला यांनी राष्ट्रकुल स्पर्धेत पदकं पटकावलेल्या क्रीडापटूंचं अभिनंदन केलं. त्यानंतर त्यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकरताच विरोधकांनी विद्यार्थ्यांवरच्या पोलीस कारवाईच्या निषेधार्थ घोषणाबाजीला सुरुवात केली. सभापतींनी कामकाज चालवण्याची विनंती करूनही गदारोळ सुरूच राहिल्यानं त्यांनी कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब केलं. कामकाजाला पुन्हा सुरूवात झाल्यानंतर स्थगन प्रस्तावाच्या सर्व नोटिसा

नाकारल्याची माहिती पीठासीन अधिकाऱ्यांनी दिली. त्यानंतर कागदपत्रं सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली. एक देश, एक निवडणूक या विषयावरच्या संयुक्त संसदीय समितीचा कार्यकाळ संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्याच्या पहिल्या दिवसापर्यंत वाढवायला लोकसभेनं मंजुरी दिली. सध्या लोकसभेत पेपरफुटीला आळा घालण्यासाठीच्या सुधारणा विधेयकावर चर्चा सुरू आहे. सभागृहाचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या चर्चेत भाग घेतला.

**राज्यसभेच्या** कामकाजाची सु़ुरुवात आज कागदपत्रं सभागृहाच्या पटलावर ठेवून झाली. त्यानंतर अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी शून्य प्रहर पुकारला. विद्यार्थी नेता आईशी घोष हिच्यावरच्या पोलीस कारवाईवरून विरोधकांनी गोंधळ घातल्याने कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करावं लागलं. पुन्हा कामकाज सुरू होताच अध्यक्षांनी प्रश्नोत्तराचा तास घ्यायचा प्रयत्न केला, पण विरोधकांनी घोषणाबाजीला सुरुवात केली. गदारोळ सुरूच राहिल्यानं कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

नीट यूजी पेपरफुटी प्रकरणातील १३ आरोपींविरुद्ध सीबीआयनं काल दिल्लीतल्या विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल केलं. गुन्हेगारी कट रचणं, फसवणूक, पुरावे नष्ट करणं असे विविध आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले आहेत.

नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयने राज्यातील पुणे, लातूरसह राजस्थान हरियाणा आणि दिल्लीत छापे टाकून आरोपींना अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपींवर सार्वजनिक परीक्षा गैरप्रकार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हे दाखल केले असून हे सर्वजण सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

**<><><><><>**

संपूर्ण देशात आज गुरुपौर्णिमा अतिशय भक्तीभावाने आणि उत्साहात साजरी केली जात आहे. आपल्या जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या आणि ज्ञानाचा प्रकाश

देणाऱ्या गुरुंचं स्मरण करून त्यांच्याप्रति आदरभाव आणि कृतज्ञता व्यक्त केली जाते.

बौद्ध परंपरेतही गुरुपौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. बोधगया इथं ज्ञानप्राप्ती केल्यानंतर भगवान गौतम बुद्ध सारनाथ इथं आले आणि इथंच त्यांनी आपल्या शिष्यांना धर्मोपदेश केला होता. त्यामुळे बौद्ध धर्मियही आजच्या दिवशी भगवान गौतम बुद्धांची पूजा करून त्यांना अभिवादन करतात. आज देशभरात विविध मंदिरांमध्ये, मठांमध्ये आश्रमांत आणि शैक्षणिक संस्थांमध्ये गुरुपूजन केलं जात असून विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनीही जनतेला गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये गुरुला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचं त्यांनी संदेशात म्हटलं आहे. गुरु आपल्या शिष्याला केवळ ज्ञान देत नाही तर आपल्या विद्यार्थ्यांना सत्य, कर्तव्य आणि सेवा मार्गावर चालण्याची प्रेरणा देत सुजाण नागरिकही ते घडवत असतात, असं उपराष्ट्रपतींनी त्यांच्या संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. गुरु केवळ ज्ञान देणारे नसतात तर आपल्या शिष्यांमध्ये सकारात्मकता, योग्य विचार, आचार देत त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण करत असतात, असं प्रधानमंत्री मोदी यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे. गुरू त्यांचे आदर्श, त्यांची शिकवण हे प्रत्येकाच्या जीवनातील प्रेरणा आणि सामर्थ्याचा स्रोत बनावेत, असंही प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात नमूद केलं आहे.

**<><><><><>**

'नीट' परीक्षा पेपरफुटी प्रकरणी नवी दिल्लीतल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरून युट्युब या समाज माध्यमावरच्या व्हिडीओ मधल्या टिप्पणीवरून, राजकीय

समालोचक टी. जी. मोहनदास यांच्या विरोधात केरळ पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेनं गुन्हा दाखल केला आहे.

मोहनदास यांनी 'पत्रिका' या आपल्या युट्यूब चॅनेलवर प्रसारित केलेला व्हिडिओ सार्वजनिक शांतता भंग करणारा आणि नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण करणारा असल्याच्या तक्रारीवरून तिरुवनंतपुरम इथल्या सायबर पोलिसांनी एफ आय आर दाखल केला होता. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

<><><><>

कोळसा खाण वाटप प्रकरणी माजी प्रधानमंत्री दिवंगत मनमोहन सिंह यांच्या विरोधातला फौजदारी खटला सर्वोच्च न्यायालयानं आज बंद केला आणि त्यांच्या विरोधात जारी करण्यात समन्स रद्द केला. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि व्ही. मोहना यांचा समावेश असलेल्या पीठानं, माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंह आणि अन्य काही जणांना 'क्लीन चिट' देणारा सीबीआयचा 'क्लोजर रिपोर्ट' स्वीकारला.

<><><><>

ग्लासगो इथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत गुलवीर सिंगने पुरुषांच्या दहा हजार मीटर धावण्याच्या शर्यतीत रौप्य पदक जिंकलं आहे. या प्रकारात पदक जिंकणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. याखेरीज भारोत्तोलन स्पर्धेत महिलांच्या ६९ किलो वजनी गटात २२९ किलो वजन उचलून हरजिंदर कौरने रौप्यपदक पटकावलं आहे. या पदकासह भारताची पदकसंख्या १२ झाली आहे, यात २ सुवर्ण, ७ रौप्य आणि ३ कांस्यपदकांचा समावेश आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत मिळवलेल्या यशाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुलवीर सिंग याचं अभिनंदन केलं आहे.

<><><><>

आज आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिवस. वाघांचं संरक्षण, त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचं जतन केलं जावं, त्यांची संख्या वाढावी तसंच वाघांबद्दल समाजात जागरुकता वाढावी या उद्देशानं आज संपूर्ण जगात वाघ दिवस साजरा केला जातो. रशियाच्या सेंट् पीटर्सबर्ग शहरात नोव्हेंबर २०१० मध्ये झालेल्या परिषदेत वाघ दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या परिषदेत भारतासह १३ देशांच्या नेत्यांनी २०२२ पर्यंत वाघांची संख्या वाढवण्याचं उद्दिष्ट्य ठेवलं होतं. आजमितीला संपूर्ण जगात मिळून ५ हजार ७११ वाघ आहेत.

आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिवसानिमित्ताने उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वन्यप्रेमींना शुभेच्छा दिल्या आहेत. भारतामध्ये वाघांची संख्या सर्वाधिक असून अत्याधुनिक पद्धतीनं त्यांचं संरक्षण आणि संवर्धन केलं जात असल्याचं उपराष्ट्रपतींनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

भारताच्या व्याघ्र संवर्धनातील यशाचा गौरव करत देश वाघांचं संरक्षण आणि संवर्धनासाठी वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात नमूद केलं आहे. देशातील व्याघ्र संवर्धनाचे प्रयत्न हे निसर्गाशी सुसंवाद साधत जगण्याच्या शतकानुशतकांच्या सांस्कृतिक परंपरेतून प्रेरित आहेत, तसंच हे प्रयत्न सामूहिक सहभागामुळे अधिक बळकट झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

ओदिशामध्ये संततधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली असून, राज्याच्या अनेक भागातलं जनजीवन विस्कळीत झालं आहे. भद्रक या जिल्ह्याला पुराचा सर्वाधिक फटका बसला असून, भंडारिपोखरी आणि धामनगर प्रभागातला मोठा भूभाग पाण्याखाली गेला आहे. अकुआपाडा इथं बैतरानी नदीनं धोक्याची पातळी ओलांडली आहे.

पुरामुळे जाजपूर आणि धामनगर दरम्यानची वाहतूक खंडित झाली असून, अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. राज्यातल्या आठ जिल्ह्यांमधल्या शाळा आज

बंद ठेवण्यात आल्या असून, प्रशासनानं पूरग्रस्त भागातल्या बचाव कार्याला वेग दिला आहे.

राज्याच्या काही भागांत आजही मुसळधार पावसाची शक्यता असून, सखल आणि पूरप्रवण भागांतल्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा जारी करण्यात आला आहे.

<><><><><>

विदर्भ, छत्तीसगड आणि पूर्व मध्य प्रदेशात उद्यापर्यंत जोरदार ते अती जोरदार पावसाची शक्यता असून, हवामान विभागानं प्रदेशासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. दिल्ली, हरियाणा, चंदीगड, हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तराखंड आणि उत्तर प्रदेशासाठी पुढले दोन दिवस 'ऑरेंज' अलर्ट जारी करण्यात आला असून, जम्मू-काश्मीर, लडाख, उत्तर प्रदेश, झारखंड, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज मुसळधार पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

<><><><><>

पाकव्याप्त काश्मीरमध्ये निर्माण झालेल्या असंतोषादरम्यान पाकिस्तानी सैन्यदलांनी केलेल्या हिंसाचारात गेल्या २ दिवसांत किमान ४० जण ठार झाले आहेत, तर अनेकजण जखमी झाले आहेत. ५ जूनपासून या संघर्षात शंभरपेक्षा जास्त लोक मृत्यूमुखी पडल्याचा दावा युनायटेड काश्मीर पीपल्स नॅशनल पार्टीनं केला आहे. संयुक्त राष्ट्र, युरोपीय संघ आणि आंतरराष्ट्रीय समुदायानं इथल्या नागरिकांच्या मदतीसाठी पुढे यावं, असं आवाहनही पार्टीनं केलं आहे.

//<><><><><>//